# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.12.2025** **वार:बुधवार**

---

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार प्रदान – डॉक्टर जयंत नारळीकर यांचा मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कारानं गौरव
- राज्यातील महापालिका निवडणुकांसाठी प्रशासकीय यंत्रणांची तयारी; उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ
- महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युती-आघाडीसाठी राजकीय पक्षांच्या चर्चा, बैठकांचं सत्र सुरू
- राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर
- आणि
- महिला क्रिकेटमध्ये भारताचा श्रीलंकेवर 7 गडी राखून दणदणीत विजय

**विज्ञान**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात आयोजित एका समारंभात राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार २०२५ प्रदान केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रात बहुमुल्य योगदान देणाऱ्यांना देशातील हा सर्वोच्च पुरस्कार देण्यात येतो. विज्ञानरत्न, विज्ञानश्री, विज्ञान युवा-शांती स्वरूप भटनागर आणि विज्ञान चमू या चार श्रेणींमध्ये हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. पद्मविभूषण प्राध्यापक डॉक्टर जयंत विष्णू नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. त्याचबरोबर आठ शास्त्रज्ञांना विज्ञानश्री पुरस्कार आणि १४ तरुण शास्त्रज्ञांना विज्ञान युवा श्रेणी अंतर्गत सन्मानित करण्यात आलं. टीम अरोमा मिशन सीएसआयआरला विज्ञान चमू पुरस्कार देण्यात आला.

महाराष्ट्रातून ६ जणांना सन्मानित करण्यात आलं असून त्यात मुंबईतील डॉक्टर युसुफ मोहमद शेख, प्राध्यापक महान महाराज, प्राध्यापक अनिरुद्ध भालचंद्र पंडित आणि नागपूरचे डॉक्टर एस वेंकट मोहन यांना विज्ञान श्री

पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर पुण्याचे डॉक्टर सुहृद मोरे आणि मुंबईचे प्राध्यापक सव्यसाची मुखर्जी, यांना विज्ञान युवा – शांतिस्वरूप भटनागर पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<u>उमेदवारीअर्ज</u>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया काल सुरू झाली. येत्या ३० डिसेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येतील. ३१ डिसेंबर रोजी अर्जांची छाननी होईल आणि २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होईल. उमेदवारी अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी नाशिक महापालिकेसाठी 1 हजार 763 अर्जांची विक्रमी विक्री झाली तरसांगली, मिरज आणि कुपवाड मध्ये ५७४ अर्जांची विक्री झाली. नांदेड महापालिकेसाठी ६६३ तर जालनाइथं ८०४ उमेदवारी अर्जांची विक्री झाली.

**<u>पुणे-प्रशासन-तयारी</u>**

महापालिका निवडणुकीसाठी विविध शहरातील प्रशासकीय यंत्रणा तयारीला लागल्या आहेत. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाकडून विविध निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती तसंच सर्व कार्यालयांची ठिकाणं निश्चित करण्यात आली आहेत. उमेदवारांना ना-हरकत आणि थकबाकी प्रमाणपत्र तसेच प्रचार परवाने मिळण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. १६० पोलिसांची नियुक्ती तसंच २३ हजार कर्मचाऱ्यांना आदेश जारी करण्यात आले आहेत.

**<u>ठाकरे-युती-मुं.</u>**

महापालिका निवडणुकांसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातल्या युतीची घोषणा आज होणार असल्याची माहिती खासदार संजय राऊत यांनी काल मुंबईतदिली. दोन्ही पक्षांमध्ये जागा वाटप पूर्ण झालं असून मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा भाईंदर, नाशिक आणि पुणे महापालिका निवडणूक दोन्ही पक्ष एकत्र लढवतील, असं राऊत म्हणाले.

**<u>पुणे-पिंचिं</u>**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत शरद पवार आणि अजित पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रितरित्या निवडणूक लढवू शकतात, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी

काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली.

**<u>कॉंग्रेसप्रचार</u>**

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगानं कॉंग्रेस पक्षाच्याप्रचाराचा प्रारंभ प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल धुळ्यात केला. या निवडणुकीसाठी कॉंग्रेसनं आघाडीच्या प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.

पुणेप्राप्तीकर-हेल्पलाइन-भावसार-प्रपा-चिंचोळकर

महानगरपालिका निवडणुकी दरम्यान पैशांच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी पुणे प्राप्तिकर विभागातर्फे २४ तास खुल्या नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

**<u>राहुरी</u>**

शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळं रिक्त  झालेल्या राहुरी विधानसभा मतदारसंघात, केंद्रीय निवडणूक आयोग विशेष मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रीया राबवणार आहे. याअंतर्गत २९ डिसेंबरपर्यंत मतदान केंद्रांचं सुसुत्रीकरण होईल. ३ जानेवारीला मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध होईल. ३ जानेवारीपासून २४ जानेवारीपर्यंत त्यावर आक्षेप नोंदवता येतील आणि दावे दाखल करता येतील. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यावर १४ फेब्रुवारीला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होईल, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

**<u>Intro-</u>**

रोजगार निर्मिती आणि व्यापक ग्रामीण विकासासाठी पुरेसा निधी सुनिश्चित करण्यासाठी विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत १ लाख ५१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हंटलं आहे. या योजनेद्वारे विकसित, स्वावलंबी, दारिद्र्यमुक्त आणि रोजगाराभिमुख गावं निर्माण करण्यासाठी जलसंवर्धन, ग्रामीण पायाभूत सुविधांची कामे, उपजीविकेवर आधारित उपक्रम आणि आपत्ती निवारण उपायांवर लक्ष केंद्रित करण्यात आलं असल्याचं त्यांनी सांगितलं. याविषयी दृकश्राव्य संदेशाद्वारे बोलताना ते म्हणाले ...

**<u>स्क्रिप्ट</u>**

*विकसित भारत जी राम जी योजना मनरेगा के आगे का कदम है। मजदूर भाइयों सौ दिन की नहीं अब एक सौ पच्चीस दिन काम की गारंटी है, कानूनी गारंटी और काम नहीं तो बेरोजगारी भत्ते के प्रावधान को और सशक्त बनाया गया है। मजदूरी अगर देर से मिली तो अतिरिक्त राशि देने का प्रावधान है, और दूसरी तरफ एक विशाल धनराशि जो प्रस्तावित इसी साल है वह एक लाख इक्यावन हज़ार दो सौ बयासी करोड़ रुपए से भी ज्यादा ताकि रोजगार देने के लिए पर्याप्त पैसा हो और उस पैसे से गाँव का संपूर्ण विकास हो। विकसित भारत के लिए विकसित गाँव।*

**व्हीसी-बिबट्या-काळजी**

**इंट्रो-बिबट्या**

पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या काही भागात गेल्या काही दिवसात मानवी वस्तीत बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मानव आणि बिबट्या मधील संघर्ष कमी करण्याकरता विविध जिल्ह्यातील वनविभाग जनजागृती, ड्रोन कॅमेऱ्याद्वारे गस्त आदी उपाययोजना करत आहे. पण त्याचबरोबरीनं नागरिकांनीही आवश्यक काळजी घ्यावी असं आवाहन जुन्नर वन विभागानं केलं आहे. ही काळजी कशी घ्यायची याबाबतचा हा सविस्तर वृत्तांत..

*स्क्रिप्ट*

*अचानक बिबट्या समोर दिसला तर अजिबात न घाबरता शांत उभे रहा. पळून जाऊ नका. तुम्ही कितीही वेगाने पळालात तरी बिबट्यापेक्षा जास्त वेगाने पळू शकत नाही. पळणाऱ्या शिकारीचा पाठलाग करणे हा बिबट्याचा नैसर्गिक स्वभाव आहे, त्यामुळे तो हल्ला करू शकतो. तुमचे दोन्ही हात वर उचला आणि जोरजोरात ओरडा. असे केल्याने, बिबट्याला तुम्ही त्याच्यापेक्षा मोठे प्राणी असल्याचा भास होतो. बिबट्याचा पाठलाग करू नका. त्याला जखमी करू नका. बिबट्या घाबरुन उलटा हल्ला करु शकतो. शेतात फिरताना काहीजणांनी एकत्र, घोळक्याने फिरावं अंधारात एकट्याने जाऊच नका, किंवा जाताना मोठ्याने गाणी म्हणा, बोला किंवा रेडिओवर गाणी लावून बॅटरी घेऊन फिरा. बंदिस्त जागेतच झोपा. सोबतीने किंवा समुहाने वावरा. मुलांना कधीही एकटं सोडू नका. गावाजवळील मोकाट कुत्री, बकऱ्या, डुकरे यांची संख्या कमी करा, गुरे रात्रीच्या वेळी गोठ्यात बांधताना गोठा सर्व बाजूने बंदिस्त राहील याची काळजी घ्या. आणि महत्त्वाचं म्हणजे कोणत्याही अफवांना बळी पडू नका.*

**संतोष** देशमुख

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराड आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात काल आरोप निश्चित झाले. वाल्मिक कराड आणि त्यांच्या साथीदारांनी ही हत्या केल्याचं आरोपपत्रात नमूद आहे, असं विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी सांगितलं.

**<u>रत्नागिरी</u>**-बंधारे

रत्नागिरी पंचायत समितीनं पाणी साठवण्याच्या दृष्टीनं काल मिशन बंधारे उपक्रम राबवला. याअंतर्गत एकाच दिवसात ९५ ग्रामपंचायतींमध्ये मिळून पाचशेहून अधिक बंधारे लोकसहभागातून बांधण्याची मोहीम राबवण्यात आली.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये विशाखापट्टणम् इथं भारत आणि श्रीलंका यांच्यात काल झालेल्या 20 षटकांच्या सामन्यात भारतानं श्रीलंकेचा 7 गडी राखून पराभव  केला. 11 षटकं आणि 5 चेंडुंमध्येचं भारतानं 129 धावांचं लक्ष गाठत हा विजय मिळवला. या विजयासह भारतानं पाच सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील पुढचा सामना २६ डिसेंबरला तिरुवनंतपुरम इथं खेळला जाणार आहे.

**<u>हवामान-IMD</u>**

राज्यात येत्या 24 तासात हवामान कोरडं राहणार असून, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. पुणे,मालेगाव,नाशिक,आणि गोंदिया इथं किमान तापमान 8 अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदवलं गेलं असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.